# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 25.10.2024** **वार – शुक्रवार**

---

**निवडणूक**

पुणे शहर आणि जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. विविध पक्षांच्या उमेदवारी याद्या जाहीर होत असून काही पक्षांचे नेते उमेदवारी अर्जही दाखल करत आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातर्फे काल जाहीर झालेल्या उमेदवारांच्या यादीत हडपसर मतदार संघातून माजी महापौर प्रशांत जगताप यांना उमेदवारी देण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे माजी आमदार चेतन तुपे यांना उमेदवारी देण्यात आली असून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे साईनाथ बाबर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यामुळे हडपसर मतदार संघात तिरंगी लढत होण्याची चिन्ह आहेत.

वडगाव शेरी मतदारसंघातून काल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातर्फे माजी आमदार बापूसाहेब पठारे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे तर राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे माजी आमदार सुनील टिंगरे यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

काँग्रेसचे माजी उपमहापौर आबा बागुल यांनी पर्वती विधानसभा मतदारसंघातून अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. महाविकास आघाडीच्या जागावाटपात हा मतदारसंघ काँग्रेसला मिळावा अशी मागणी बागुल यांनी पक्षश्रेष्ठींकडे केली पण महाविकास आघाडीचा उमेदवार जाहीर होण्यापूर्वीच त्यांनी अर्ज दाखल केला आहे. या मतदारसंघातून भाजपच्या माजी आमदार माधुरी मिसाळ या चौथ्यांदा निवडणूक लढवत आहेत.

कसबा विधानसभा मतदारसंघात काँग्रेसतर्फे माजी आमदार रवींद्र धंगेकर यांना पुन्हा उमेदवारी देण्यात आली आहे. महायुतीतर्फे अजून या मतदार संघात उमेदवाराची घोषणा झालेली नाही; दरम्यान कॉंग्रेसच्या माजी महापौर कमल व्यवहारे यांनी आज महाराष्ट्र स्वराज्य पक्षाचे प्रमुख छत्रपती संभाजीराजे, यांची पुण्यात भेट घेतली. स्वराज्य पक्षाकडून कसबा विधानसभा मतदारसंघात निवडणूक लढवण्याबाबत व्यवहारे यांच्याशी चर्चा झाल्याचं वृत्त आहे.

शिवाजीनगर, कॅन्टोन्मेंट, खडकवासला, कोथरूड आणि पर्वती मतदारसंघात महाविकास आघाडीतर्फे उमेदवारांच्या घोषणेची प्रतीक्षा आहे.

**मतदार जनजागृती**

विधानसभा निवडणूकीत मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिका मतदार जागृती अभियान राबवत आहे. आज चिंचवडच्या संघवी केसरी महाविद्यालयात जनजागृतीपर कार्यक्रम पार पडला; यावेळी नव मतदारांना मतदानाची शपथ देण्यात आली.

पुण्यातील कोथरूड इथल्या दृष्टिहीन मुलींच्या शाळेत आज झालेल्या पालक सभेत मतदान जागृती करण्यात आली. कोथरूड मतदार संघाच्या नोडल अधिकारी सविता वाघमारे यांनी उपस्थितांना मतदानाचं महत्त्व सांगून मतदान शपथ दिली.

**नाकाबंदी**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुण्यात नाकाबंदी करण्यात येत आहे. या नाकाबंदी दरम्यान आज सहकार नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत 138 कोटीं रुपयांचं सोन पकडण्यात आलं होतं; मात्र ज्या गाडीत हे सोनं सापडलं ती गाडी सिक्वेल सिक्युअर या कंपनीची असून, ही कंपनी सोन्या चांदीचे दागिने, आणि मौल्यवान वस्तूंची वाहतूक करते. ही गाडी नेहमीप्रमाणे या वस्तूंची वाहतूक करत होती हे स्पष्ट झालं असल्याचं आमच्या वार्ताहरानं दिलेल्या बातमीत म्हटलं आहे.

**चिकुनगुन्या-डेंग्यू**

पुण्यात हवामानामध्ये सातत्याने बदल होत असल्याने डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. यामुळे डेंग्यू, चिकुनगुन्याच्या रुग्णसंख्येत वाढ होत आहे. शहरात महिनाभरात डेंग्यूचे पाचशेच्यावर संशयित रुग्ण तर चिकुनगुन्याचे 275 रुग्ण आढळले आहेत. दरम्यान शहरात डास प्रतिबंधक औषधांची फवारणी सातत्याने सुरू असल्याचे आरोग्य विभागानं म्हटलं आहे.

**दिवाळी**

सेवा भारती पश्चिम प्रांतच्या छत्रपती संभाजी नगर भागाच्या कार्यकर्त्यांनी यंदाची दिवाळी मुळशी तालुक्यातील भुईणी ह्या दुर्गम भागातील गावाच्या ग्रामस्थांबरोबर साजरी केली. ह्या गावातील नागरिकांना आवश्यक असणाऱ्या दैनंदिन तसंच दिवाळीच्या अनुषंगानं विविध वस्तूंचं वाटप यावेळी करण्यात आलं.

**निधन**

पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेडचे कामगार आणि जनसंपर्क अधिकारी सतीश गाटे यांचं आज सकाळी पुण्यात हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाल. ते 56 वर्षांचे होते. पी एम पी मध्ये त्यांनी विविध महत्त्वपूर्ण पदांवर एकंदर 28 वर्ष काम केलं. उद्या पुण्यात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

**क्रिकेट**

पुणे क्रिकेट कसोटीच्या दुसऱ्या दिवशी फलंदाजांच्या निराशाजनक कामगिरीमुळे भारताचा पहिला डाव 156 धावांवर आटोपला. न्यूझीलंडनं आपल्या दुसऱ्या डावाला सुरुवात केली असून दिवस अखेर त्यांच्या 5 गडी बाद 198 धावा झाल्या आहेत. पाहुण्या संघाकडे सध्या 301 धावांची आघाडी आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात उद्या आकाश अंशतः ढगाळ राहण्याचा अंदाज असून कमाल तापमान 34 अंश सेल्सियसच्या आसपास राहील असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**